(ESTD. 1965) **Gondia Education Society's**

**SETH NARSINGDAS MOR COLLEGE OF ARTS & COMMERCE &**
**SMT. G. D. SARAF SCIENCE COLLEGE**

Tumsar-441912 (M.S.) Dist. Bhandara

Ph. No. Office : (07183) 233300 Res. : (07183) 233301

Email - principalsnmorcollege@rediffmail.com, snmorcollege1965@gmail.com website : snmorcollege.org.in

Ref. No. : SNMC/2023-24 Date : 20.04.2023

# राष्ट्रीय सेवा योजना वार्षिक अहवाल : २०२२-२०२३

## १) स्वच्छता अभियान :-

दि. ३०/०७/२०२२ रोजी एन.एस.एस. विभागातर्फे महाविद्यालयात स्वच्छता अभियान घेण्यात आले, अभियानाअंतर्गत महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता करण्यात आली, यामध्ये प्लास्टीक व कच-याचे निर्मुलन करुन महाविद्यालयातील परिसराची स्वच्छता करण्यात आली. या निमित्ताने एन.एस.एस. च्या स्वयंमसेवकांमध्ये श्रममुल्य रुजविण्यात आली, या अभियानात महाविद्यालयाचे प्राचार्य, डॉ. सी. बी. मसराम, प्राध्यापक व एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी सहभाग घेतले, या स्वच्छता अभियानात ६० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.







## २) हर घर तिरंगा अभियान :-

दि. ०८/०८/२०२२ रोजी एन.एस.एस. विभाग व पंचायत समिती, तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने तिरंगा बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले, हि रॅली तुमसर ते आंबागड किल्ला या ठिकाणी घेऊन जाण्यात आले, यावेळी एन.एस.एस. च्या विद्यार्थ्यांनी आंबागड किल्यावरील प्लास्टीक वेचून तेथील स्वच्छता करण्यात आली, यावेळी तुमसर पंचायत समितीचे बी.डी.ओ. श्री. नंदागवळी साहेब, तेथील कर्मचारी व एस. एन. मोर महाविद्यालयाचे प्राध्यापक आणि एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी मार्गदर्शन केले या रॅलीत ६५ एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांनी सहभाग घेतला. तसेच दि. १३, १४ व १५ ऑगष्ट २०२२ रोजी हर घर तिरंगा अभियांनाअंतर्गत विद्यार्थ्यांनी प्रत्येक घरात जाऊन तिरंग्यांचे वाटप व त्याचे महत्व पटवून दिले.






**३) पोषण आहार पखवाड़ा :-**

दि. १६/०९/२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग व गृह अर्थशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय पोषण माह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले, यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणुन गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय, तुमसर येथील प्राध्यापिका डॉ. कल्पना राऊत उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम, गृह अर्थशास्त्र विभागाच्या विभाग प्रमुख डॉ. भारती काटेखाये, एन.एस.एस. विभाग प्रमुख प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाला ७० विद्यार्थी उपस्थित होते.

पोषण माह निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पोषक पदार्थांचे स्टॉल लावण्यात आले, या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये व्यावसायिकता व पोषण असा संदेश देण्यात आला, या फूड फेस्टीवल मध्ये ३५ ते ४० स्टॉल विद्यार्थ्यांमार्फत लावण्यात आले.







## ४) मतदार नोंदणी कार्यक्रम :-

दि. १९/०९/२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागातर्फे मतदार नोंदणी जनजागृती कार्यक्रम घेण्यात आले, या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणुन तुमसर येथील उपजिल्हाधिकारी बी. वैष्णवी (आय.ए.एस.) मॅडम यांनी एन.एस.एस. च्या स्वयंसेवकांना मतदार नोंदणी चे महत्व पटवून देवून महाविद्यालयातील नव मतदारांना नोंदणीसाठी प्रवृत्त केले, यावेळी तुमसर चे नायब तहसिलदार श्री. पेंदाम साहेब यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आयोजन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले, मतदार नोंदणी कार्यक्रमात ८० विद्यार्थ्यांना सहभाग घेतला.









## ५) एन. एस. एस. वर्धापन दिवस :-

दि. २४/०९/२०२२ रोजी महाविद्यालातील एन.एस.एस. विभागातर्फे एन.एस.एस. वर्धापन दिन साजरा करण्यात आला, या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम उपस्थित होते, तर प्रमुख वक्ता म्हणुन शारीरीक शिक्षण विभागाचे प्रा. डॉ. संतोष चौधरी यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले, कार्यक्रमाचे सूत्र संचालन एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी केले. या कार्यक्रमाला एन.एस.एस. चे ७० विद्यार्थी उपस्थित होते.










## ६) गांधी जयंती :-

दि. २ ऑक्टोंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग आणि लॉयन्स क्लब तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने “शांतता रॅली” काढण्यात आली, ही रॅली तुमसर पोलिस स्टेशन ते महात्मा गांधी पुतळयापर्यंत नेण्यात आली, या रॅलीमध्ये लॉयन्स क्लब तुमसरचे अध्यक्ष इंजि, सतीश रेखावार, माजी खासदार श्री. मधुकरजी कुकडे, तुमसरचे नगराध्यक्ष इंजि. प्रदीपजी पडोळे, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले व तुमसरचे सामाजिक कार्यकर्ते नागरीक आणि एन.एस.एस. चे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या रॅलीला यशस्वी बनविले.





## ७) रक्तदान शिबीर :-

दि. ०७/१०/२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभाग व एन.सी.सी. विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले, या शिबीरात एन.एस.एस. आणि एन.सी.सी. च्या ३५ विद्यार्थ्यांनी रक्तदान केले, या यशस्वी शिबीराला सफल करण्यासाठी सुभाषचंद्र बोस शासकीय रुग्णालयातील डॉ. लहाने व त्यांच्या चमूने महत्वाचे योगदान दिले, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले, एन.सी.सी. विभाग प्रमुख प्रा. अरुण चौहान तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक प्राध्यापिका यांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेतला.










## ८) न्यायिक जनजागृती कार्यक्रम :-

दि. ११/११/२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागातर्फे न्यायिक जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला, या कार्यक्रमात "रॅगिंग" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले, उपस्थित विद्यार्थ्यांना समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राहुल भगत यांनी रॅगिंग या विषयी कायदेशीर मार्गदर्शन केले, तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम यांनी या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणुन उपस्थित होते, तर कार्यक्रमाचे सुत्र संचालन, एन.एस.एस. विभाग प्रमुख यांनी केले तर आभार एन. एस. एस. स्वयंसेवक प्रणय कुंभारे या विद्यार्थ्याने मानले, कार्यक्रमाला ९० विद्यार्थ्यांना सहभाग नोंदविला.









**बिरसा मुंडा जयंती व अनुसूचित जनजाती गौरव दिवस :-**

दि. १५/११/२०२२ रोजी महाविद्यालयातील एन.एस.एस. विभागातर्फे बिरसा मुंडा जयंती साजरी करण्यात आली, यावेळी कायक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. बी. मसराम तर प्रमुख पाहुणे म्हणुन तुमसर पोलिस स्टेशन चे पी. आय. श्री. संजय टेकाम साहेब उपस्थित होते, यावेळी उपस्थित मान्यवरांनी बिरसामुंडा यांच्या तैलचित्राला माल्यार्पण करुन कार्यक्रमाचे उद्धाटन केले, तसेच एन.एस.एस. च्या विद्यार्थीनी गोंडी नृत्यावर लोकनृत्य सादर केले, यावेळी उपस्थित मान्यवरांनी बिरसामुंडा यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकला, तसेच अनुसूचित जनजाती "गौरव दिवस" का साजरा करण्यात येतो, याबद्दलही महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाला यशस्वी करण्यासाठी एन. एस. एस. चे स्वयंसेवक व एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी परिश्रम घेतले.








## ९) संविधान दिन :-

दि. २६ नोव्हेंबर २०२२ रोजी एन.एस.एस. विभाग आणि राज्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने “संविधान” दिवसाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ. राजेंद्र बेलोकार यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर त्यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांकडून संविधानाचे वाचन करून घेतले व संविधानावर डॉ. बेलोकार यांना मार्गदर्शन सुध्दा केले.

या कार्यक्रमाला श्री. सुनिल कान्होलकर (ग्रंथपाल), डॉ. सचिन वेरुळकर, डॉ. राजेश दिपटे, डॉ. राधेशाम दिपटे, डॉ. रेणुकादास उबाले, प्रा. अमोल खांदवे, डॉ. संजय आगाशे, डॉ. संतोष चौधरी, डॉ. कु. अरुणा बावनकर, डॉ. कु. भारती काटेखाये, प्रा. कु. आरती साळवे आदि प्राध्यापक वृंद व एन.एस.एस. चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. लक्ष्मण पेटकुले यांनी मानले. या कार्यक्रमाला ३५ विद्यार्थी उपस्थित होते.






## १०) महापरिनिर्वाण दिन :-

दि. ६ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या “महापरिनिर्वाण दिन” राज्यशास्त्र विभाग व एन.एस.एस. विभाग यांच्या संयुक्त विद्यमान साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तैलचित्राला एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी यांच्या हस्ते माल्यार्पन करुन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन करण्यात आले. यावेळी मोठया संख्येत महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापिका व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्र संचालन व आभार डॉ. राजेंद्र बेलोकार यांनी केले.

या कार्यक्रमाला मोठ्या प्रमाणात एन.एस.एस. चे विद्यार्थी, शिक्षकेत्तर कर्मचारी ही उपस्थित होते.




